चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०२ सप्टेंबर, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# भद्रावती पोलीस आणि स्थागुशा पथकाची संयुक्त कार्यवाही

- एटीएम मधील २२ लक्ष रोख चोरीचा गुन्हा उघड
- मेन्टेनंस आणि कॅश लोडींग करणारेच निघाले आरोपी

दिनांक ०४/०८/२०१९ रोजी पोलीस स्टेशन भद्रावती अंतर्गत रेल्वे स्टेशन रोड मंजुषा ले आउट येथील हीताची कंपनीचा एटीम फोडल्याबाबतची तक्रार दाखल झाली. या तक्रारीवरून पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी दाखल होवुन एटीएममशीनची पाहणी केली असता, तक्रारदार हीताची कंपनी नामे प्रशांत वैद्य यांनी सांगीतले की, सदर मशिन मधुन २२ लाख ८४ हजार १०० रू व एटीएम मधील सीपीयु कोणीतरी अज्ञात इसमाने मशीन तोडुन चोरून नेले. यावरून पोलीस स्टेशन भद्रावती येथे अप. क्र. ५०८/२०१९ कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच पोलीस पथकाने तपासास सुरूवात केली. एटीएम मशीनला नेमके कोणत्या वस्तुने तोडले, कशा पध्दतीने पैसे काढण्यात आले याचा प्रथमतः तपास करण्यात आला. तद्नंतर चंद्रपुर गडचिरोली एरियामधील संपुर्ण एटीएमचे मेन्टेनंस करणारा एनसीआर कंपीनीचा इंजिनिअर नितीन तुळशिराम गेडाम ला बोलावुन त्यास विचारपुस करून त्यांची चौकशी करण्यात आली. सोबतच कॅश लोडींग करणारे सीएमएस कंपनीचे कॅश लोडर नामे मंगेश सुखदेव धाबर्डे आणि गोपाल भाउराव इंगोले यांची सुध्दा चौकशी करण्यात आली. एटीएम मशीनचे संपुर्ण डिटेल काढण्यात आले. यात पोलीसांना माहिती मिळाली की, सदरची मशीन ही त्यावेळेस नादुरूस्त झाल्याने मशीन दुरूस्ती करीता इंजीनिअर नितीन याला बोलाविण्यात आले होते. तसेच मशीनमधील कॅश संपल्याने कॅश लोडर यांना सुध्दा कॉल देण्यात आला होता. मशीन दुरूस्ती आणि कॅश लोडींगच्या नावाखाली सदर तिन्ही इसमांनी कट रचुन मशीनमध्ये छेडछाड करून दिनांक ०४/०८/२०१९ रोजी सकाळी १६ लाख रू. आणि रात्री दरम्यान उरर्वरीत रक्कम असे एकुण २२ लक्ष ८४ हजार १०० रू व एटीएम सीपीयु सुध्दा चोरून नेले. यावरून आरोपी इंजिनिअर नामे १) नितीन तुळशिराम गेडाम वय ३६ रा. गोपालपुरी चंद्रपुर, कॅश लोडर आरोपी नामे २) मंगेश सुखदेव धाबर्डे वय ३२ वर्ष, ३) गोपाल भाउराव इंगोले वय ३६ वर्ष दोन्ही रा. बालाजी वार्ड गोपालपुरी चंद्रपुर यांना दिनांक ०१/०९/२०१९ रोजी अटक करण्यात आली आहे. आरोपीतांकडुन आतापर्यंत ८ लाख रू चोरीतील रोख जप्त करण्यात आली असुन आरोपीच्या पुढिल तपासाकरीता पोलीस कोठडी घेण्यात आली आहे.

सदरचा तपास श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात, उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा, श्री. निलेश पांडे यांचे नेतृत्वात, स्थागुशा प्रभारी पोनि. ओ.जी.कोकाटे आणि भद्रावती पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. यादव यांचेसह, सपोनि. सुधिर वर्मा पोस्टे भद्रावती, तसेच भद्रावती पोलीस स्टेशन आणि स्थागुशा पथक येथील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी महत्वाची भुमिका बजाविली.

---

# जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना नागभिड पोलीसांकडुन अटक

दिनांक २७/०७/२०१९ रोजी फिर्यादी नामे जितेंद्र मोहन चोरमुले वय ५४ रा. पवनखारी गोबरवाडी, ता. तुमसर भंडारा यांनी पोलीस स्टेशन नागभिड येथे तक्रार दिली की, चंद्रपुर नागभिड मार्गे नागपुर रोडवर ते आपल्या ट्रक जात असतांना तुकुम, गावाजवळ तीन इसम एका कार ने उतरून त्यांचे ट्रक वर दगडफेक केली. त्यानंतर फिर्यादी यांचे जवळील १० हजार रोख आणि एक मोबाईल किं. २ हजार रू जबरीने हिसकावुन नेले. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन नागभिड येथे अप.क्र. २६६/२०१९ कलम ३९२, ३४ भादंवि अन्वये नोंद करण्यात आला.

गून्हयाचा तपासादरम्यान पोलीसांना माहिती मिळाली की, गुन्हा करते वेळी आरोपीतांनी एक्सयुव्ही एमएच ४३ बीपी १४६२ ही गाडी वापरलेली होती. यावरून वाहनाचा शोध घेतला असता सदरचे वाहन हे झुम कार या ॲप्च्या माध्यमातुन नागपुर येथुन किरायाने घेतलेले होते. पोलीस पथकास झुम कारच्या माध्यमातुन वाहन किरायाने घेणाऱ्या नाव पत्ता मिळुन आल्याने पोलीसांनी भंडारा येथुन एका इसमास ताब्यात घेतले. त्यास विचारपुस केली असता त्यांने सांगीतले की, त्यांने त्यांचा लायन्सस त्यांचा मित्राला वाहन किरायाने घेण्यासाठी दिला होता.

यावरून गुन्हयाचा तपासादरम्यान सखोल चौकशी करून **आरोपी नामे १)** कार्तीक रघुनाथ अवसरे वय २५ रा. आशिर्वाद नगर नागपुर, **२)** अमोल योगराज मेश्राम वय २२ व्याहाड खुर्द सावली, **३)** राजकरण नरेंद्र कलीये वय २४ रा. किसान नगर व्याहाड खुर्द, यांना अटक करण्यात आली असुन आरोपी नामे अकील मामु उर्फ अन्ना याचा शोध सुरू आहे. पुढिल तपास नागभिड पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन नागभिड प्रभारी पोनि. श्री. गांगुर्डे यांचे नेतृत्वात नागभिड येथील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी पार पाडली.

---

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# वरोरा पोलीसांची धडाकेबाज कार्यवाही

## चोरीच्या १० दुचाकीसह २ आरोपी जेरबंद

## स्थागुशा पथकाकडुन सुध्दा ०५ दुचाकी जप्त

दिनांक २९/०८/२०१९ रोजी पोलीस स्टेशन वरोरा येथे मोटारसायकल चोरी झाल्याबाबत ची तक्रार अप.क्र. १०८५/२०१९ कलम ३७९ भादंवि अन्वये नोंद करण्यात आली. गुन्हा नोंद होताच वांरवार मोटारसायकली चोरीच्या तक्रारी पुढे येत असल्याने वरोरा पोलीसांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवुन मोटारसायकल आणि मोटारसायकल चोरी करणाऱ्याचा शोध घेण्यास सुरवात केली. तपासादरम्यान गोपनीय माहितीवरून वरोरा पोलीसांनी अपुर्वा नगर येथील एका व्यक्तीस ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याचे घरी एक संशयीत दुचाकी विना नंबरची मिळुन आली. चौकशी दरम्यान त्याने कबुली दिली की, ती दुचाकी त्याने चोरी केलीली आहे. यावरून सदर दुचाकी ताब्यात घेवुन आरोपी नामे क्षितीज वासुदेव गेडाम वय ३२ रा. अपुर्वा नगर वरोरा यास अटक करण्यात आली. सदर आरोपीची कसुन चौकशी केली असता, त्याने यापुर्वी सुध्दा मोटारसायकली केल्याची कबुली दिल्याने आणि काही मोटारसायकली चिमुर परिसरातील आरोपी नामे राजु यादवराव सुरपाम वय ४२ वर्ष याला विक्री केल्याची कबुली दिल्याने सदर आरोपीस सुध्दा ताब्यात घेवुन दोन्ही आरोपीतांकडुन ०७ हीरो होंडा स्प्लेंडर, ०२ बजाज पल्सर, १ होंडा एक्टीव्हा असे एकुण १० मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा श्री. निलेश पांडे यांचे मार्गदर्शनात वरोरा पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. उमेश पाटील, यांचे नेतृत्वात पोउपनि विनित घागे, सफौ. दौलत चालखुरे, पुरूषोत्तम पेंढारकर, विलास बल्की, पोना. दिपक दुधे, पोशि सुरज मेश्राम यांनी पार पाडली.

---

तसेच स्थागुशा पथकाने दिनांक ०१/०९/२०१९ रोजी पोलीस स्टेशन रामनगर येथील ०३, पोलीस स्टेशन बल्लारशाह ०१, चंद्रपुर शहर ०१ अशा वेगवेगळया पोलीस स्टेशनला दाखल गुन्हयातील ०५ दुचाकी जप्त करण्यात आल्या असुन आरोपी नामे १) गौतम गणेश विश्वास वय २४ वर्ष २) देवाशिष गुरूपत विश्वास वय ४० वर्ष दोन्ही रा. शामनगर चंद्रपुर यांना अटक करण्यात आली आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात स्थागुशा प्रभारी पोनि. ओ.जी.कोकाटे यांचे नेतृत्वात स्थागुशा पथकाने पार पाडली.

# झुम कार या ॲप्सद्वारे वाहन बुक करून दारू तस्करी करणारे आरोपी वरोरा पोलीसांच्या जाळयात

## ०५ आरोपीसह १८ लक्ष १३ हजाराचा मुद्देमाल जप्त

दिनांक २७/०८/२०१९ रोजी पोलीस स्टेशन वरोरा येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम दोन चारचाकी वाहनाने नागपुर ते वरोरा मार्गे चंद्रपुर कडे अवैध रित्या दारूची तस्करी करणार आहे. अशा माहिती वरून वरोरा पोलीसांनी नंदोरी टोल नाक्याजवळ नाकेबंदी लावुन वाहनाची तपासणी करीत असतांना, मिळालेल्या माहितीप्रमाणे एक मारूती ब्रिझा आणि एक महिंद्रा केयुव्ही वाहन येतांना दिसले. सदर वाहनास संशयावरून थांबवुन विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता दोन्ही वाहनामध्ये अवैध रित्या दारूचा साठा दिसुन आला. सदर मालाची तपासणी केली असता १) मारूती ब्रिझा वाहन क्र. एम एच ४३ बीजी ९६१९ मध्ये देशी दारूच्या १००० निपा, किं. १,००,०००/—रू, २) महिंद्रा केयुव्ही वाहन कं. एमएच ४३ बीजी ७४६९ मध्ये देशी दारूच्या ८०० निपा किं. ८०,०००/—रू. चा दारूचा माल मिळुन आला. सदरचा माल ताब्यात घेवुन वाहन चालक आणि वाहनातील इतर इसम **आरोपी नामे १)** संजय रमेश शिकरवार वय ४७ रा. नारा रोड, नुरी कॉलनी नागपुर, **२)** ईरशाद आलम खुर्शीद आलम वय २२ रा. जाफर नगर नागपुर, **३)** समिर सादिक खान वय २७ रा. सदर न्यु कॉलनी छिंदवाडा रोड नागपुर, **४)** आकाश शंकर गुप्ता वय २६ रा. मानकापुर, रतन नगर नागपुर, **५)** देवेंद्र रामचंद्र शर्मा वय २८ रा. मानकापुर कोराडी रोड नागपुर, यांना अटक करण्यात आली आहे. **चौकशी दरम्यान आरोपीतांनी कबुली दिली की, सदरचे वाहन त्यांनी झुम कार या मोबाईल ॲप्लीकेशनद्वारे पैसे देवुन किरायाने घेतले होते.**

सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन वरोरा येथे नोंद करण्यात आला असुन आरोपीतांकडुन मारोती ब्रिझा वाहन किं. १०,००,०००/—रू, एक महिंद्रा केयुव्ही किं. ६,००,०००/—रू याचे सह ०५ मोबाईल फोन किं. २८,०००/—रू असा **एकुण १८,१३,०००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात वरोरा पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. उमेश पाटील यांचे नेतृत्वात पोउपनि. श्री. विनित घागे, पोना. दिपक दुधे, पोशि. निखिल कौरासे, पोशि. प्रविण यांनी पार पाडली.

———————————————————————————————

# स्थानिक गुन्हे शाखेची दारू तस्कराविरूध्द कार्यवाही
# दोन आरोपीसह १२ लक्ष १० हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक ०२/०९/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, दोन इसम नागपुर कडुन चंद्रपुर कडे एका महिंद्रा स्कॉर्पिओ वाहनाने अवैध रित्या दारूची वाहतुक करणार आहे. अशा माहिती वरून स्थागुशा पथकाने प्रिर्यदर्शनी चौक चंद्रपुर येथे नाकेबंदी लावुन, मिळालेल्या माहितीप्रमाणे एका महिंद्रा स्कॉर्पिओ वाहनास ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये ६० बॉक्स देशी दारू किं. ६,००,०००/—रू, चा दारूचा माल मिळुन आला. सदरचा माल व दारू वाहतुकीकरीता वापरलेली महिंद्र स्कॉर्पिओ क्र. एमएच ३१ डीसी ०८९९ किं. ६,००,०००/—रू, आणि दोन मोबाईल फोन किं. १०,०००/—रू असा एकुण १२,१०,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे १)शंकर किसन देवकर वय २५ रा. बोरखेडी रेल्वे ता.जि. नागपुर, २)प्रमोद दिलीप पवार वय २० रा. बुरांडा ता. मारेगाव जि. यवतमाळ यांना अटक करण्यात आली असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे, यांचे नेतृत्वात पोहवा. राजेंद्र खनके, कैलास खोब्रागडे, पोना. मनोज रामटेके, मिलींद चव्हाण, अमजद खान, जमीर, अविनाश, चंदु, पोशि. प्रफुल मैश्राम, मयुर येरणे, संदिप मुळे यांनी पार पाडली.

————————————————————————————————————————